SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,
दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,
www.unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

# विद्यार्थी विकास विभाग

Dr. P. T. Gaikwad
Director, Students' Development
Phone – (0231) 2609175, 2609475
Email: dsw@unishivaji.ac.in

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/२४ दि. २१/०५/२०२४

प्रति,

मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण, संस्था
मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः— सन २०२४—२०२५ या शैक्षणिक वर्षाचे विद्यार्थी पालक शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी रक्कम पाठविणेबाबत.**

महोदय,/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात, आपणांस कळविण्यात येते की, सन २०२४—२०२५ या शैक्षणिक वर्षासाठी आपल्या महाविद्यालयामध्ये/अधिविभागामध्ये प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रती विद्यार्थी रू. १००/— प्रती शिक्षक प्रती वर्षी रू. ५००/—प्रशासकीय सेवक वर्ग १ व वर्ग २ अधिकारी — प्रती व्यक्ती प्रती वर्षी रू. ५००/— वर्ग ३ व वर्ग ४ प्रती सेवक प्रती वर्षी रू. ३००/— व संस्थाचालक पदाधिकारी प्रती सदस्य प्रतीवर्षी रू. ७००/— इतकी कल्याण निधी रक्कम घेण्यात यावी व **सदर होणारी रक्कम ताबडतोब विद्यार्थ्यांच्या प्रवेशानंतर एक महिन्यांच्या आत अंदाजपत्रकीय शिर्षक E.3.R.49 या खाती ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी**

सदरची रक्कम विद्यापीठाकडे जमा केल्याच्या पावतीची प्रत व कल्याण निधी धारकांची यादी खाली नमुद केल्याप्रमाणे विहीत नमुन्यात विद्यार्थी विकास विभागाकडे त्वरीत जमा करावी. सदर पावती व यादी एकाच वेळी जमा करावी, स्वतंत्रपणे जमा करून घेतली जाणार नाही. तसेच सदरची पावती व यादी जमा केल्याशिवाय संबंधित महाविद्यालयाचे कल्याण निधी प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

**उपरोक्त नमुद प्रमाणे कल्याण निधी रक्कम विद्यापीठात वेळेत न भरल्यास कल्याण निधी प्रस्तावाबाबत महाविद्यालय जबाबदार राहील.**

**असे निदर्शनास आले आहे की, बऱ्याच महाविद्यालयामार्फत फक्त विद्यार्थ्यांची कल्याण निधी रक्कम भरली जाते. मात्र नियमित सेवेतील शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी, संस्थाचालक यांची कल्याण निधी रक्कम भरली जात नाही. याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद प्रमाणे शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक यांची कल्याण निधी रक्कम सोबत जोडलेल्या नियमावलीमध्ये नमुद केल्याप्रमाणे दि. ३० जूलै, २०२४ पुर्वी भरणे बंधनकारक आहे.**

**आपल्या महाविद्यालयातील सर्व घटकांची कल्याण निधी रक्कम व नमुद केल्याप्रमाणे मुदतीमध्ये भरल्याशिवाय आपल्या महाविद्यालयाकडून प्राप्त कल्याण निधी प्रस्तावावर कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

...२

तसेच बऱ्याच महाविद्यालयामार्फत संपूर्ण प्रवेशित विद्यार्थ्यांचा निधी भरला जात नाही. विद्यापीठामध्ये प्रती विद्यार्थी भरलेली रक्कम व महाविद्यालयामार्फत ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) या पोर्टलवर नमुद केलेली विद्यार्थी संख्या यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) च्या पोर्टलवर नमुद केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार सदर निधी जमा करावयाचा आहे.

**कल्याण निधी भरलेल्या सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक यांची यादी मा. प्राचार्य यांच्या सहीने खालील नमुन्यात पाठविणे अनिवार्य आहे.**

**विद्यार्थी :—**

| अ. क्रं | विद्यार्थ्यांचे नाव | वय | वर्ग | वारसदाराचे नाव व नाते | आई व वडिल | वय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांची यादी नमुना :—**

| अ. क्रं | शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचे नाव | वय | वारसदाराचे नाव | नाते |
|---|---|---|---|---|
| | | | | |

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक
विद्यार्थी विकास

सोबत: वरीलप्रमाणे

Estd : 1962
'A++' *Accredited by* NAAC (2021)
with CGPA 3.52

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## विद्यार्थी विकास विभाग

# विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजना

### शैक्षणिक वर्ष
### २०२२–२०२३ पासून
### (सुधारणांसह)



# विद्यार्थी विकास विभाग
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजना

**प्रस्तावना**

शिवाजी विद्यापीठ अंर्तगत येणाऱ्या विविध संलग्न महाविद्यालयातील तसेच अधिविभागातील विद्यार्थी त्यांचे पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी ही योजना विद्यार्थी विकास विभागामार्फत सन २०१४-२०१५ पासून सुरू करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासून या योजनेमध्ये काही बदल केलेले आहेत. त्यानुसार सदर योजना कार्यान्वित आहे. तथापि दि. १९/०५/२०२० रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्रं. ०५ नुसार डॉ. सी. टी. कारंडे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या सुचनांचा अंर्तभाव या योजनेमध्ये केलेला आहे. दि. २२/०१/२०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्रं. ११ नुसार त्यास मान्यता मिळालेली होती. व त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजना (सुधारणासह) लागू करण्यात आली.

कोविड-१९ च्या परिस्थितीमुळे महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभाग काही दिवस बंद होते. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना / महाविद्यालयांना / अधिविभागांना कल्याण निधी प्रस्ताव वेळेत सादर करता आले नाहीत. त्यामुळे कल्याण निधी नियमावलीनुसार प्रस्ताव नामंजूर करावे लागत होते. याकारणास्तव विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये म्हणून या विभागामार्फत दि. ०९/०२/२०२२ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी वाढवणेबाबत विषय ठेवण्यात आला होता. सदर व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये, शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ आणि २०२१-२०२२ या दोन शैक्षणिक वर्षाकरिता कल्याण निधी प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी शिथील करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच योजनेचा आढावा घेवून सर्व आर्थिक माहितीसह शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ साठी लागू करण्यापुर्वी विषय ठेवण्यात यावा व समितीचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांचे नामनिर्देशन करण्यात आले. व्यवस्थापन परिषदेच्या सदर ठरावानुसार प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांचे अध्यक्षतेखाली कल्याण निधी योजनेचा आढावा घेण्याकरिता समितीची बैठक दि. २२/०३/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीमध्ये ठरल्यानुसार कल्याण निधी योजनेमध्ये काही दुरूस्त्या करून व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०८ जुलै, २०२२ रोजी झालेल्या बैठकीमधील ठराव क्रं. २१ नुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून कल्याण निधी योजना सुधारित स्वरूपात लागू केली आहे.

- **योजनेचे नाव : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजना.**
- **योजनेची व्याप्ती :**

१. **विद्यार्थी:**

अ) शैक्षणिक वर्षामध्ये ज्या विद्यार्थ्याने शिवाजी विद्यापीठामध्ये किंवा संलग्नित महाविद्यालयामध्ये तसेच दूरशिक्षण केंद्रांतर्गत प्रवेश घेतलेला आहे असा विद्यार्थी या योजनेच्या लाभास पात्र असेल.

ब) एम. फिल व पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांनाही ही योजना लागू असेल.

क) विद्यार्थ्याचा प्रवेश हा कमीत कमी एक वर्ष, पुर्णवेळ कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी असावा. विद्यार्थी दोन किंवा अधिक ठिकाणी वेगवेगळया अभ्यासक्रमास प्रवेशित असल्यास त्याला एकाच अभ्यासक्रमामधून लाभ घेता येईल व त्याप्रकारचे प्रतिज्ञा पत्र दयावे लागेल.

२. **पालकः**

विद्यार्थ्यांनी पालकांची नोंद खाली दिल्याप्रमाणे नमूना फॉर्मद्वारे त्या-त्या वर्षी प्रवेशाच्या वेळी करणेची आहे.

अ) ज्या विद्यार्थ्यांचे पालक (आई व वडील/दोघेही) ह्यात आहेत त्यांनी पालक या नात्याने आई व वडील यांचीच नोंद करावी.

ब) ज्या विद्यार्थ्यांचे आई किंवा वडील (दोन पालकांपैकी एक) हयात नाहीत त्या विद्यार्थ्यांनी हयात असणाऱ्या पालकांची नोंद करावी.

क) ज्या विद्यार्थ्यांचे आई आणि वडील दोघेही हयात नाहीत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे पालकत्व स्विकारलेल्या एका व्यक्तीची नोंद पालक म्हणून करावी.

ड) ज्या विद्यार्थीनीचे लग्न झालेले आहे अशा विद्यार्थीनीने फक्त पतीचेच नाव पालक म्हणून नोंदविणे आवश्यक आहे.

३. **शिक्षकः**

शिवाजी विद्यापीठातील तसेच शिवाजी विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयामध्ये/संशोधन संस्थेमध्ये/विद्यापीठ परिसरातील अधिविभागामध्ये पुर्ण वेळ कार्यरत असतील असे कायमस्वरूपी शिक्षक या योजनेच्या लाभास पात्र असतील. तसेच पुर्णवेळ प्राचार्य/प्रभारी प्राचार्यही या योजनेच्या लाभास पात्र असतील.

४. **प्रशासकीय सेवकः**

शिवाजी विद्यापीठ कार्यालयातील तसेच शिवाजी विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयातील/संशोधन संस्थेमधील कायमस्वरूपी प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी हे या योजनेच्या लाभास पात्र असतील. यामध्ये पुर्ण वेळ कार्यरत असणारे प्राचार्य लाभास पात्र असतील.

५. **संस्थाचालक पदाधिकारी:-**

शिवाजी विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयाचे अधिकृत असणारे संस्थाचालक पदाधिकारी हे या योजनेच्या लाभास पात्र असतील. (काही कारणास्तव संबंधित संस्थेचे संस्थाचालक पदाधिकारी यांचा कार्यकाल संपलेस अगर काही बदल झालेस याबाबत संबंधित संस्थेकडून त्वरीत विद्यार्थी विकास विभागास कळविणे आवश्यक आहे.)

६. ही योजना शिवाजी विद्यापीठांशी संलग्नीत सर्व महाविद्यालये, संशोधन संस्था (स्वायत्त संस्थासह) विद्यापीठ परिसरातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभाग, दूरशिक्षण केंद्र, विद्यापीठ उपकेंद्र यामधील सर्व विद्यार्थी, पुर्णवेळ व कायमस्वरूपी शिक्षक, कर्मचारी, अधिकारी, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अधिकृत असणारे संस्थाचालक पदाधिकारी व प्रशासकीय सेवक यांना बंधनकारक असेल. त्यामुळे या योजनेत नमूद कल्याण निधी शुल्क भरणे सक्तीचे आहे.

- **योजनेपोटी भरावे लागणारे शुल्क :**

शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून कल्याण निधी शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात येत आहे.

१. **विद्यार्थी :** प्रती विद्यार्थी प्रतीवर्षी रू. १००/-

२. **शिक्षक :** प्रती शिक्षक प्रतीवर्षी रू. ५००/-.

३. **प्रशासकीय सेवक :** वर्ग १ व वर्ग २ अधिकारी : प्रती व्यक्ती प्रती वर्षी रू. ५००/-
प्रती सेवक (वर्ग ३ व वर्ग ४) प्रतीवर्षी रू. ३००/-

४. **संस्थाचालक पदाधिकारी :** प्रती सदस्य प्रती वर्षी रू. ७००/-

५. महाविद्यालयाकडे जमा होणारी रक्कम एक महिन्याच्या आत विद्यापीठाकडे वर्ग करावी. रक्कम

विद्यापीठामध्ये जमा केल्यानंतर त्याची पावती व संबंधित अधिकारी, विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक पदाधिकारी यांची यादी ताबडतोब विद्यार्थी विकास विभागाकडे जमा करावी. अन्यथा संबंधित महाविद्यालयातील प्रस्तावाबाबत संबधित महाविद्यालय जबाबदार राहील.

**टीप :** विद्यार्थ्यांचे कल्याण निधी शुल्क प्रवेशाच्या वेळीच जमा करून घ्यावे व तशी नोंद प्रवेश पावतीमध्ये करावी. तसेच हंगामी शिक्षक/कर्मचारी यांचेकडून शुल्क भरून घेऊ नये. त्यांचे प्रस्ताव मंजूर होणार नाहीत. या योजनेसाठी विद्यापीठाने Online Portal सुरू केल्यास सर्व माहिती Portal द्वारेच भरावी.

- **योजनेपोटी दिला जाणारा निधी :**

१. **विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी/संस्थाचालक पदाधिकारी यांचा नैसर्गिक/आकस्मित मृत्यु :**

विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक पदाधिकारी यांचा नैसर्गिक/आकस्मित मृत्यु झाला तर विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या वारसाला रू. १,५०,०००/- इतकी कल्याण निधी रक्कम देण्यात येईल. तथापि, जेव्हा विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी /संस्थाचालक पदाधिकारी महाराष्ट्राच्या बाहेरील राज्यात/इतर देशात विद्यापीठाच्यावतीने स्पर्धेत भाग घेण्यासाठीधविद्यापीठाच्या कामासाठी/संशोधन/कार्यशाळा/परिषदा/ शैक्षणिक सहल इत्यादी साठी जातात, त्यावेळी त्यांच्या सुरक्षतेची जबाबदारी वाढते व ते विद्यापीठाच्या वतीने/विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी जात असल्यामुळे या कालावधीत जर त्यांचा नैसर्गिक/अपघाती मृत्यु झाला तर त्यांच्या वारसांना रू. २,००,०००/- इतकी कल्याण निधी रक्कम देण्यात येईल.

२. **विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी यांचे अपंगत्व:**

विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय सेवक व संस्थाचालक पदाधिकारी यांचे अपघाताने किंवा आजारपणामुळे हात, पाय व डोळे हे अवयव पुर्णपणे निकामी झाले तर त्यांना खालीलप्रमाणे कल्याण निधी रक्कम देण्यात येईलरू

उदा. एक हात- रू. २५,०००/-, एक पाय- रू. २५,०००/-, एक डोळा- रू. २५,०००/-

यांप्रमाणे हात (२), पाय (२), व डोळे (२) यासाठी जास्तीत जास्त रू. १,५०,०००/-

इतकी कल्याण निधी रक्कम देण्यात येईल.

३. **पालकांचा नैसर्गिक/आकस्मित मृत्यु :** विद्यार्थ्यांच्या पालकाचा आकस्मित/नैसर्गिक मृत्यु झाला तर सदर विद्यार्थ्यास रू. ७५,०००/- इतकी कल्याण निधी रक्कम देण्यात येईल.

४. **विद्यार्थ्यांच्या पालकांचे अपंगत्व:** विद्यार्थ्यांच्या पालकाचे अपघात किंवा आजारपणामुळे अवयव पुर्णपणे निकामी झाले तर त्यांना या योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे कल्याण निधी रक्कम देण्यात येईल.

अ) एक हात/एक पाय/एक डोळा पुर्णपणे निकामी झाल्यास एकत्रित जास्तीत जास्त रू. २५,०००/- (कमाल).

ब) दोन हात/दोन पाय/दोन्ही डोळे पुर्णपणे निकामी झाल्यास एकत्रित जास्तीत जास्त रू. ५०,०००/- (कमाल).

५. **एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक प्रस्ताव असतील तर ते नियमानुसार मान्य करण्यात येतील.**

उदा. अ) दोन भावंडे विद्यार्थी असतील आणि त्यांच्या पालकाचा मृत्यु झाल्यास दोन्ही भावंडांना या योजनेचा लाभ मिळेल.

ब) विद्यार्थ्यांचे पालक हे शिक्षक/कर्मचारी (महाविद्यालय/विद्यापीठामध्ये) असतील व योजनेत समाविष्ट असतील आणि अशा पालकाचा मृत्यु झाल्यास पाल्यांना व वारसदार यांना स्वतंत्रपणे या योजनेचा लाभ मिळेल.

- **कल्याण निधी प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी :** घटना घडल्यापासून कल्याण निधी प्रस्ताव सादर करण्याची कमाल मर्यादा १८० दिवस असणार आहे.

- **कल्याण निधी योजनेची मुदत :**

१. या योजनेची मुदत विद्यार्थ्याने (महाविद्यालय/अधिविभागामध्ये) प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून एक (१) वर्षापर्यंत, म्हणजेच एक दिनदर्शिका वर्ष (Calender Year) किंवा ३६५ दिवस राहील. उदा. दि. १० जून २०२२ रोजी प्रवेश घेतल्यास कल्याण निधीची मुदत दि. १० जून २०२२ रोजी रात्री १२.०० वाजल्यापासून दि. १० जून २०२३ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत असेल. त्यामुळे प्रवेशाच्या वेळीच शुल्क भरणे तसेच त्याची नोंद प्रवेश पावतीमध्ये असणे आवश्यक आहे.

२. शिक्षक व कर्मचारी यांचे शुल्क प्रत्येक वर्षी दि. ३० जुलै पुर्वी भरणे बंधनकारक आहे. त्याचा कालावधी विद्यापीठात रक्कम भरल्याच्या दिनांकापासून गणला जाईल. (उदा. वरील १ प्रमाणे).

३. त्या-त्या शैक्षणिक वर्षात जुलै ते सप्टेंबर या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे कल्याण निधी शुल्क भरून घेऊ नये.

४. संस्थाचालक पदाधिकारी यांचेसाठी सदरची योजना दि. ०१ जुलै, ते ३० जून या कालावधीपर्यंत लागू राहील.

५. संस्थाचालक पदाधिकारी यांचे शुल्क व संस्थाचालक पदाधिकारी यांची यादी दि. ३० जून पर्यत विद्यार्थी विकास विभागास सादर करणे आवश्यक आहे.

- **कल्याण निधी प्रस्ताव सादर करताना द्यावयाची कागदपत्रे:**

कल्याण निधी प्रस्ताव सादर करताना संबंधित वारसास फार त्रास न होता प्रस्ताव सादर करता यावा व त्याला कल्याण निधी रक्कम लवकरात लवकर मिळावी यासाठी प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे:

**अ) अपघाती मृत्यु:**

१. पोलीस पंचनामा रिपोर्ट

२. पोस्ट मार्टम रिपोर्ट

३. मृत्यु प्रमाणपत्राची मूळ प्रत

४. महाविद्यालयाचे/अधिविभागाचे संबंधित वारसास कल्याण निधी रक्कम देण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र

५. रू. १०० च्या स्टॅम्पवर वारसदाराचे ॲफिडेव्हीट मुळ प्रत (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे)

६. आगाऊ पोहोच पावती (१ रूपयाचे पावती तिकिट लावून सही करणे)

७. आधार कार्डची साक्षांकित प्रत

८. विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी यांनी कल्याण निधी रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत

९. महाविद्यालयाने कल्याण निधी रक्कम विद्यापीठात भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत

१०. प्राचार्यांच्या/अधिविभागप्रमुखांच्या सहीसह विद्यार्थ्यांची संपुर्ण वर्गाची यादी (विद्यार्थ्यांच्या प्रस्तावाबाबत)

११. प्राचार्यांच्या सहीसह शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी यांची यादी

(शिक्षक, प्रशासकीय सेवक व संस्थाचालक पदाधिकारी यांच्या प्रस्तावाबाबत)

१२. राष्ट्रीयकृत बँक पासबुक पहिले पान झेरॉक्स प्रत

१३. रेशनकार्डच्या पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स प्रत

१४. उपरोक्त सर्व कागदपत्रांपैकी जी मुळ कागदपत्रे दयावयाची आहेत, ती सोडून इतर कागदपत्रांच्या प्रती साक्षांकित करून देण्यात याव्यात.

**ब) नैसर्गिक मृत्यु:**

१. मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत

२. वैद्यकीय प्रमाणपत्र

३. महाविद्यालयाचे/अधिविभागाचे संबंधित वारसास कल्याण निधी रक्कम देण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र

४. रू. १०० च्या स्टॅम्पवर वारसदाराचे ॲफिडेव्हीट मुळ प्रत (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे)

५. आगाऊ पोहोच पावती (१ रूपयाचे पावती तिकिट लावून सही करणे)

६. आधार कार्डची सांक्षाकित प्रत

७. विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी यांनी कल्याण निधी रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत

८. महाविद्यालयाने कल्याण निधी रक्कम विद्यापीठात भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत

९. प्राचार्याच्या/अधिविभागप्रमुखांच्या सहीसह विद्यार्थ्यांची संपुर्ण वर्गाची यादी (विद्यार्थ्याच्या प्रस्तावाबाबत)

१०. प्राचार्याच्या सहीसह शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी यांची यादी (शिक्षक, प्रशासकीय सेवक व संस्थाचालक पदाधिकारी यांच्या प्रस्तावाबाबत)

११. राष्ट्रीयकृत बँक पासबुक पहिले पान झेरॉक्स प्रत

१२. रेशनकार्डच्या पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स प्रत

१३. उपरोक्त सर्व कागदपत्रांपैकी जी मुळ कागदपत्रे दयावयाची आहेत, ती सोडून इतर कागदपत्रांच्या प्रती साक्षांकित करून देण्यात याव्यात.

**क) अपघाताने आलेले अपंगत्व:**

१. पोलीस पंचनामा रिपोर्ट

२. जिल्हा शल्यचिकित्सक यांचा वैद्यकीय दाखला

३. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा दाखला (विद्यार्थ्याशी संबंधित)

४. महाविद्यालयाचे/अधिविभागाचे संबंधित वारसास कल्याण निधी रक्कम देण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र.

५. रू. १०० च्या स्टॅम्पवर वारसदाराचे ॲफिडेव्हीट मुळ प्रत (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे)

६. आगाऊ पोहोच पावती (१रूपयाचे पावती तिकिट लावून सही करणे.)

७. आधार कार्डची सांक्षाकित प्रत

८. विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी यांनी कल्याण निधी रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत

९. महाविद्यालयाने कल्याण निधी रक्कम विद्यापीठात भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत

१०. प्राचार्याच्या/अधिविभागप्रमुखांच्या सहीसह विद्यार्थ्यांची संपुर्ण वर्गाची यादी (विद्यार्थ्याच्या प्रस्तावाबाबत)

११. प्राचार्याच्या सहीसह शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी याची यादी (शिक्षक, प्रशासकीय सेवक व संस्थाचालक पदाधिकारी यांच्या प्रस्तावाबाबत)

१२. राष्ट्रीयकृत बँक पासबुक पहिले पान झेरॉक्स प्रत

१३. रेशनकार्डच्या पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स प्रत

१४. उपरोक्त सर्व कागदपत्रांपैकी जी मुळ कागदपत्रे दयावयाची आहेत, ती सोडून इतर कागदपत्रांच्या प्रती साक्षांकित करून देण्यात याव्यात.

**ड) आजारापणामुळे आलेले अपंगत्व:**

१. जिल्हा शल्यचिकित्सक यांचा वैद्यकीय दाखला

२. आजारापणाबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र

३. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांचा दाखला (विद्यार्थ्याशी संबंधित)

४. महाविद्यालयाचे/अधिविभागाचे संबंधित वारसास कल्याण निधी रक्कम देण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्र

५. रू. १०० च्या स्टॅम्पवर वारसदाराचे ॲफिडेव्हीट मुळ प्रत (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे)

६. आगाऊ पोहोच पावती (१रूपयाचे पावती तिकिट लावून सही करणे)

७. आधार कार्डची सांक्षाकित प्रत

८. विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी यांनी कल्याण निधी रक्कम भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत

९. महाविद्यालयाने कल्याण निधी रक्कम विद्यापीठात भरलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत

१०. प्राचार्यांच्या/अधिविभागप्रमुखांच्या सहीसह विद्यार्थ्यांची संपूर्ण वर्गाची यादी (विद्यार्थ्यांच्या प्रस्तावाबाबत)

११. प्राचार्यांच्या सहीसह शिक्षक/प्रशासकीय सेवक/संस्थाचालक पदाधिकारी यांची यादी (शिक्षक, प्रशासकीय सेवक व संस्थाचालक पदाधिकारी यांच्या प्रस्तावाबाबत.)

१२. राष्ट्रीयकृत बँक पासबुक पहिले पान झेरॉक्स प्रत

१३. रेशनकार्डच्या पहिल्या व शेवटच्या पानाची झेरॉक्स प्रत

१४. उपरोक्त सर्व कागदपत्रांपैकी जी मुळ कागदपत्रे दयावयाची आहेत, ती सोडून इतर कागदपत्रांच्या प्रती साक्षांकित करून देण्यात याव्यात.

- **प्रस्ताव सादर करताना महाविद्यालयाने/अधिविभागाने घ्यावयाची खबरदारी:**

विद्यार्थी किंवा पालकांना प्रस्तावासाठी कागदपत्रे जमा करताना त्रास होऊ नये यासाठी महाविद्यालयांनी/अधिविभागांनी खालीलप्रमाणे खबरदारी घ्यावी:

१. विद्यार्थ्यांच्या प्रवेश पावतीची एक प्रत महाविद्यालयाकडे/अधिविभागाकडे असणे आवश्यक आहे. गरजेनुसार ती विद्यार्थी किंवा पालकांना उपलब्ध करून दयावी.

२. प्रस्ताव पाठवण्यापुर्वी तो नियमानुसार योग्य असल्याची तसेच सर्व आवश्यक कागदपत्रे साक्षांकित करून सोबत जोडली असल्याची खात्री करूनच प्रस्ताव विद्यापीठाला सादर करावा (प्रत्येक वेळी नियमावलीच्या पुस्तिकेचे जरूर अवलोकन करावे).

३. त्रुटीयुक्त प्रस्ताव पाठवून कार्यालयीन वेळेचा तसेच ऊर्जेचा अपव्यय टाळावा. जेणेकरून लवकरात लवकर प्रस्ताव मंजुरीची प्रक्रिया पुर्ण करता येईल.

४. पालक/वारसदार यांच्या नोंदीसाठी स्वतंत्रपणे दिलेल्या नमुन्याचा वापर करावा (सोबत नमुना फॉर्म) व सदर माहिती विद्यापीठाकडे पाठवून दयावी. जमा झालेली रक्कम विद्यापीठाकडे भरणा केल्याची पावती विद्यार्थी विकास विभागाकडे जमा करतानाच विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी, अधिकारी, शिक्षक, संस्थाचालक पदाधिकारी वारसदारांच्या नोंदीसह सर्व माहिती (खालील दिलेल्या विहीत नमुन्यात) जमा करणे आवश्यक आहे.

**महाविद्यालयाचे नांव व पत्ता**

| अं. क्रं. | विद्यार्थ्यांचे नाव | वय | वर्ग | वारसदाराचे नाव व नाते | आई व वडील | वय |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक पदाधिकारी यांच्या यादीचा नमुना

| अं. क्रं. | शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक पदाधिकारी यांचे नाव व वय | वारसदाराचे नाव | नाते |
|---|---|---|---|
| | | | |

५. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत प्रवेशाच्या वेळी कल्याण निधी शुल्क घेतलेले नसेल तर (तथापि, महाविद्यालयाने त्यांचे शुल्क विद्यापीठाकडे जमा केलेले असेल) त्यामुळे प्रवेश पावतीमध्ये नोंद होत नाही. तरीसुद्धा त्यांच्या संबंधित इतर नोंदी व्यवस्थित ठेवणे व विद्यापीठाकडे पाठवणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची यादी जमा करताना अशा विद्यार्थ्यांची स्वतंत्र यादी जमा करावी (मुळ यादी व्यतीरिक्त).

६. चुकीचे/नियमबाहय प्रस्ताव पाठवून योजनेचा लाभ घेतल्याचे सिध्द झाल्यास सदरची भरपाई महाविद्यालयांकडून घेण्यात येईल.

७. आवश्यकता भासल्यास महाविद्यालयाने/अधिविभागाने विद्यार्थी विकास विभागामध्ये Land line: 0231-2609175, 2609475, टोल फ्री नं.: 18002334871, किवा ई-मेल: dsw@unishivaji.ac.in वर संपर्क साधावा.

८. सदर योजनेबाबत माहितीचा फलक सहभागी महाविद्यालयाने/अधिविभागाने/संस्थेने सर्वांच्या माहितीसाठी दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे.

- **कल्याण निधी योजनेच्या मर्यादा:**

१. आत्महत्या या कारणाने मृत्यु झाल्यास या योजनअंतर्गत कोणत्याही स्वरूपाचा लाभ देता येणार नाही.

२. या योजनेअंतर्गत दवाखान्याबाबतचा खर्च पुर्णत: वगळण्यात आलेला आहे.

३. मयत व्यक्तिची बाब न्याय प्रविष्ट असेल तर अशा व्यक्तीबाबत लाभ देता येणार नाही.

४. महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी संपल्यांनतर प्रस्ताव पाठवू नयेत. अशा बाबतीत संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

५. विद्यापीठ अधिविभाग, प्रशासकीय विभागातील उशीरा आलेल्या प्रस्तावांची जबाबदारी संबंधित अधिविभाग प्रमुख/ प्रशासकीय विभागप्रमुख यांची राहील.

- **कल्याण निधी योजनेचे मुल्यमापन:**

१. सदर योजनेमध्ये दरवर्षी जमा झालेली व खर्ची पडलेली एकूण रक्कम यांचा हिशोब माहे जून/जुलै मधील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीपुढे ठेवण्यात येईल. तसेच दर तीन वर्षातून एकदा किंवा आवश्यकतेनुसार दरवर्षी या योजनेचा आढावा घेण्यात येईल.

२. शिवाजी विद्यापीठ कल्याण निधी योजना अधिक प्रभावीपणे तथा सर्वसमावेशक पद्धतीने राबविता यावी याकरिता सदर योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये व नियमावलीमध्ये वेळावेळी बदल करण्याचा अधिकार व्यवस्थापन परिषदेस राहील.

३. सदर योजनेअंतर्गत विद्यार्थी/शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी/संस्थाचालक पदाधिकारी यांचेकडून जमा झालेला परंतु खर्च न झालेला निधी या योजनेच्या बजेट हेडमध्ये वर्ग करण्यात येईल.

संचालक,
विद्यार्थी विकास

# विद्यार्थ्यांसाठी/पालकांसाठी ॲफिडेव्हीटचा नमुना

मे. कार्यकारी दंडाधिकारीसो तालुका –..................................................

मी खाली सही करणार –.............................................................................वय ...........

व्यवसाय ................... रा. ................... ता. ................... जि. ................... सत्य प्रतिज्ञेवर

लिहून देतो/देते की, मी ................... गावचा/ची कायमचा/ची रहिवाशी असून माझा/माझे/माझी वडिल/आई/पती/

पालक/मुलगा/मुलगी (नको असेल ते खोडावे) नाव :–..............................................................................

दि .: ........................... रोजी मयत झाले असून/त्यांना कायमस्वरूपी अंपगत्व आले असून त्यांना आम्ही खाली नमुद केले प्रमाणे सरळ व कायदेशीर वारस आहोत.

| अं. क्रं. | नाव व पत्ता | नाते | वय |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| | | | |

येणेप्रमाणे मयतास आम्ही सरळ व कायदेशीर वारस असून या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत हे सत्य व बरोबर आहे.

सदरचे माझा/माझे/माझी वडील/आई/पती/पालक/मुलगा/मुलगी (नको असेल ते खोडावे)– .......................

.................................. या कारणाने मयत झाले आहेत तसेच त्यांचा मृत्यु आत्महत्या या कारणाने झालेला नाही.

त्यामुळे शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजनेअंतर्गत मिळणारा लाभ मला मिळणेकामी सदरचे प्रतिज्ञापत्र आज सादर केले आहे. तरी तो लाभ मला मिळावा ही विनंती. त्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे मी सोबत जोडलेली आहेत. हे सर्व मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देत आहे.

सदरचे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेला सर्व मजकूर माझे स्वतःचे माहिती प्रमाणे व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. वरील माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास मी भा. दं. सं. कलम १९२,१९३/२ व २०० अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र आहे म्हणून केले प्रतिज्ञापत्र आज रोजी –............................

# शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व संस्थाचालक पदाधिकारी यांच्या वारसांसाठी ॲफिडेव्हीटचा नमुना

मे. कार्यकारी दंडाधिकारीसाो तालुका -.........................................................................

मी खाली सही करणार -.......................................................................वय..........

व्यवसाय .................. रा. .................. ता. .................. जि. .................. सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो/देते की, मी .................. गावचा/ची कायमचा/ची रहिवाशी असून माझा/माझे/माझी वडील/आई/पती/पत्नी/मुलगा/मुलगी/भाऊ/बहीण (नको असेल ते खोडावे) नाव : -.......................................................

दि.: ...................... रोजी मयत झाले असून/त्यांना कायमस्वरूपी अंपगत्व आले असून त्यांना आम्ही खाली नमुद केले प्रमाणे सरळ व कायदेशीर वारस आहोत.

| अं. क्रं. | नाव व पत्ता | नाते | वय |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| | | | |

येणेप्रमाणे मयतास आम्ही सरळ व कायदेशीर वारस असून या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत हे सत्य व बरोबर आहे.

माझा/माझे/माझी वडिल/आई/पती/पत्नी/मुलगा/मुलगी/भाऊ/बहीण (नको असेल ते खोडावे)- .......................................................या कारणाने मयत झाले आहेत तसेच त्यांचा मृत्यु आत्महत्या या कारणाने झालेला नाही. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजनेअंतर्गत मिळणारा लाभ मला मिळणेकामी सदरचे प्रतिज्ञापत्र आज सादर केले आहे. तरी तो लाभ मला मिळावा ही विनंती. त्यासाठी लागणारी सर्व कागदपत्रे मी सोबत जोडलेली आहेत. हे सर्व मी सत्य प्रतिज्ञेवर लिहून देत आहे.

सदरचे प्रतिज्ञापत्रामध्ये नमुद केलेला सर्व मजकूर माझे स्वत:चे माहिती प्रमाणे व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. वरील माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास मी भा. दं. सं. कलम १९२,१९३/२ व २०० अन्वये कायदेशीर कारवाईस पात्र आहे म्हणून केले प्रतिज्ञापत्र आज रोजी -..........................

# हमीपत्र

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना लिहून देणेत येते की,..........................................................

............. या महाविद्यालयातील/अधिविभागातील विद्यार्थी/विद्यार्थीनी/शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी ..................

............................................... याचे/हिचे/पालक ..................................................

यांचा दि. ..................रोजी ................................... या कारणाने मृत्यू झालेला आहे. तसेच सदर विद्यार्थी/विद्यार्थीनी/शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी/हा/ही/हे/या महाविद्यालयातील/अधिविभागातील नियमित विद्यार्थी/विद्यार्थीनी/शिक्षक/प्रशासकीय कर्मचारी होता/होती/होते.

तसेच आमचे महाविद्यालयाने/अधिविभागाने सदर कल्याण निधी शुल्क रक्कम रु. ...................../- विद्यापीठाकडे पावती क्रं. ...................... दि. .............................. अन्वये जमा केलेले आहे.

तरी सदर विद्यार्थी/विद्यार्थीनी/शिक्षक/प्रशासकीय सेवक याची/हिची/यांची मंजूर कल्याण निधी रक्कम त्याचे/तिचे/त्यांचे वारस ...........................................................................................यांना देणेस आमचे महाविद्यालयाची/अधिविभागाची काही हरकत नाही.

प्राचार्य/अधिविभागप्रमुख

सही व शिक्का

Ref. No. ------------------------ Place ---------------------------

Date ---------------------------

## RECEIPT

Received from the Finance & Accounts Officer, Shivaji University, Kolhapur, an amount of Rupees -------------------------------------- (Rs. -------------------- Ps. -----------)

On account of My ---------------------------------------------------------------------------------

By Cash/ Cheque/ D. D. No. --------------------------------- Dated ----------------------------

| Particulars of Bills | Amount |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| Total - | |

Signature

Revenue Stamp Over Rs. 5000/-

Name : ----------------------------------------------

Address : ------------------------------------------

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

| | |
|---|---|
| Name of Party | |
| Address | |
| Phone no. (Mobile. no.) | |
| PAN No§. | |
| Bank A/c no. | |
| Type of Account | |
| Name of Bank | |
| Branch Name & | |
| Address | |
| Branch Code | |
| IFSC Code | |
| Aadhar Card No. | |

लाभार्थी:- प्राचार्य/अधिविभागप्रमुख

सही:- सही व शिक्का

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# विद्यार्थी विकास विभाग

SHIVAJI
UNIVERSITY KOLHAPUR

## शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी योजना

- ही योजना शिवाजी विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालये तसेच विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांच्यासाठी लागू केली आहे.
- या योजनेअंतर्गत विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा मृत्यु झाल्यास वारसास रु. 1,50,000/- इतका निधी दिला जातो.
- विद्यार्थ्यांच्या पालकांचा मृत्यु झाल्यास रु. 75,000/- इतका निधी दिला जातो.
- विद्यार्थी/ पालक / शिक्षक/ प्रशासकीय कर्मचारी यांचे हात / पाय /डोळे पुर्ण निकामी झाल्यास रु. 25,000/- ते रु. 1,50,000/- पर्यंत निधी दिला जातो.
- योजनेसाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशावेळी रु. 50/- इतके शुल्क आकारले जाते.
- शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या कडून स्वतंत्रपणे अनुक्रमे रु. 200/- व रु. 100/- इतके शुल्क घेतले जाते.
- योजनेची अधिक माहिती शिवाजी विद्यापीठ www.unishivaji.ac.in-Student-Students' Development - Department of Students' Development-Kalyan Nidhi Yojana या ठिकाणी उपलब्ध आहे. तसेच आवश्यकता असल्यास विद्यार्थी विकास विभागामध्ये 0231-2609175, टोल फ्री क्रमांक 18002334871 किंवा ई-मेल dsw@unishivaji.ac.in च्या माध्यमातून संपर्क साधावा.

बेटी बचाओ... बेटी पढाओ..!

संचालक,
विद्यार्थी विकास

Donate Organs